# ई - पोलीस पत्रिका

दिनांक १४/०१/२०२५ अनु.क्र. १०/२५

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/प्रसुती रजा/२२३/२०२५ अमरावती शहर दिनांक ०८/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांच्या न.ावासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अरजा-१४०९/प्र.क्रं.८/०९/सेवा-६, दिनांक २४/८/२००९ व दि.१५/१/२०१६ चे तरतुदीनुसार १८० दिवस प्रसुती रजा, रजा वेतनासह प्रसुतीच्या संभाव्य तारखेपासुन अथवा प्रसुतीकरीता रजेवर सुटल्याचे तारखेपासुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.नं./ नाव | नेमणुक | नियुक्ती दिनांक | प्रसुतीची वेळ | प्रसुतीची संभाव्य तारीख | अपत्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोना/१४०३, स्नेहल शं.राऊत (मानकर) | पो.स्टे. गाडगेनगर | दि.०५/१०/२००७ | दुसरी | दि.३१/०३/२०२५ | ०१ |
| २ | मपोना/११३, दिपीका बघेल (यादव) | पोलीस मुख्या | दि.२९/१०/२००७ | दुसरी | दि.१८/०२/२०२५ | ०१ |

वरिल नमुद महिला पोलीस अंमलदार यांना रजेवर सोडल्याचा व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

**२.पोआअ/आस्था-५/अर्जित रजा/२७२/२०२५ अमरावती शहर दिनांक ०९/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८१ मधील नियम ५० चेतरतुदीप्रमाने रजेवर सुटलेल्या दिनांका पासुन अर्जित रजा मंजुरकरण्यात येत आहे.

| अ.क्रं. | पदनांम /ब.न. | नाव | नेमणुक | मागीतलेली अर्जित रजा | रजा मागण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोहवा/४७४ | हरिचंद्र ईप्पर | बडनेरा | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| २ | सपोउपनि/८८८ | अब्दुल कलाम | वलगाव | १५ दिवस | उपचाराकरीता |
| ३ | मपोना/१४०३ | स्नेहल राऊत | गाडगेनगर | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| ४ | श्रेपोउपनि/२७६ | संजय नेवरे | पोलीस मुख्या | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| ५ | पोशि/१९०२ | सागरकाकणे | पोलीस मुख्या | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | पोशि/४८७ | रोशन महिंगे | पोलीस मुख्या | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| ७ | मपोशि/१७२३ | शिला मानोहर | बडनेरा | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| ८ | मपोशि/१९४ | प्रतिक्षा इंगोले | मोपवि | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| ९ | पोशि/१७३६ | अजय कवठकर | शवाशा पुर्व | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| १० | पोहवा/१६८५ | अजय कोठे | नियंत्रण कक्ष | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| ११ | पोहवा/०८ | एकनाथ चव्हाण | गाडगेनगर | १५ दिवस | आईच्या उपचाराकरीता |
| १२ | पोहवा/५६७ | पंकज गावंडे | पोलीस मुख्या | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| १३ | मपोशि/८५१ | रिना मेन | पोलीस मुख्या | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| १४ | मपोशि/१८९६ | आरतीतुरखडे | राजापेठ | १५ दिवस | गर्भवती असल्याने |
| १५ | पोशि/१७५९ | प्रविण मोरे | पोलीस मुख्या | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| १६ | सपोउपनि/३१४ | कैलाश सानम | गुन्हे शाखा | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| १७ | मपोशि/३७५ | अश्विनी मोंढे | नागपुरी | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| १८ | मपोहवा/१३३४ | जया इंगळे | नागपुरी | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| १९ | सपोउपनि/९०८ | संजय आवनकर | नि.कक्ष | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| २० | पोना/४३२ | विकास गडधे | गुन्हे शाखा १. | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |
| २१ | श्रेपोउपनि/६०८ | राजेंद्रकथलकर | वाचक शाखा | ३० दिवस | मुलीचे लग्ना करीता |
| २२ | पोशि/१६३३ | कैलाशकास्देकर | आरसीपी | १५ दिवस | धार्मिककामाकरीता |

तसेच नमुद पोलीस अंमलदार यांना रजेवर रवाना केलेल्या दिनांकापासुन अर्जित रजा उपभोगल्याचा अहवाल या कार्यालयातसादर करावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

### शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोहवा-१०१४ अली/१०७९९/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन भातकुली, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ६५६/२०२४, दिनांक १३/०७/२०२४

२) या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/आस्था-१/कर्तव्य भातकुली/८९९५/२०२३, दिनांक ०३/०८/२०२३

३) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/का.दा.नो./पोहवा-१०१४ मुस्ताक अली/६५७६/२०२४, दिनांक २२/०७/२०२४

**कसुरदारचे नाव :-** पोहवा/१०१४ मुस्ताक अली, तत्का नेमणुक पोलीस स्टेशन भातकुली, (सध्या नेमणुक पोलीस मुख्यालय), अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोहवा/१०१४ मुस्ताक अली, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्हाला वरील संदर्भीय क्र. ०२ अन्वये या कार्यालयाचे आदेशान्वये पुढील कर्तव्य करणेकरीता पोलीस स्टेशन भातकुली, अमरावती शहर येथे पाठविण्यात आलेले होते. तुम्ही दिनांक ०६/०८/२०२३ चे ११.१४ वा.नुसार पोलीस स्टेशन भातकुली या ठिकाणी हजर झाले होते. तुमची पोलीस स्टेशन भातकुली येथे डयुटी अधिकारी म्हणुन कर्तव्य करीत असतांना पोलीस स्टेशनला तक्रार देणारे नागरीका सोबत तुम्ही उध्दटपणे वागणुक करुन त्यांचे तक्रार घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे व गुन्हे बकींग करत असल्याचे तक्रार देणारे नागरीक यांनी तुमच्या बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे.भातकुली यांना दिलेल्या तक्रारी बद्दल अनेक वेळा तोंडी समज दिल्या आहेत. तुमची दि.०३/०७/२०२४ रोजी २१.०० वा. ते दि.०४/०७/२०२४ चे ०९.०० वा. पर्यत डयुटी अधिकारी म्हणुन डयुटी असतांना महिला अर्जदार यांचे तक्रार वरुन मोबाईल क्र. ९७६४६८६५७१ धारक विरुध्द दि. ०३/०७/२०२४ चे २३.०४ वा. एन.सी.नं. २५२/२०२४ कलम ३५१ (४) भारतीय न्याय संहिता २००३ प्रमाणे अदखलपात्र गुन्हयांची नोंद झालेली आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे.भातकुली यांना तुम्ही गैरअर्जदार मोबाईल क्र. ९७६४६८६५७१ धारक विठ्ठल दिगांबर ठाकरे यांचे जबाब नोंदविले असता त्यांनी  सांगीतले की, गैरअर्जदार यांचे कडून चुकी झाले त्यांना दि.०३/०७/२०२४ रोजी रात्री पोलीस स्टेशन चे समोर एक नाझीम नावाचा व्यक्ती यांनी गैरअर्जदार यांना रु. ५०००/- मध्ये सदर प्रकरण निपटुन टाकतो सदर प्रकरण मुस्ताक सर यांचे कडे आहे. म्हणुन गैरअर्जदार यांनी नाझीम याला रु. ५०००/- दिले वरुन गैरअर्जदार यांना मुस्ताक यांनी नोटीस दिली, त्यानंतर गैरअर्जदार दि.०४/०७/२०२४ रोजी सुध्दा नाझीम नावाचा व्यक्ती यांनी परत फोन करुन रु. ५०००/- हजर रुपयात केसचा निपटारा होत नाही. परत रु. ५०००/- पाहिजे असे म्हटले आहे. तुमची कर्तव्यप्रती वागणुक ही अशोभनिय असुन तुमचे असे वागणुकी मुळे लाचलुचपत विभागाकडुन सापळा कार्यवाही होण्याची दाट शक्यता आहे.

तुम्ही पो.स्टे.भातकुली येथे डी.ओ.डयुटी ऑफिसर म्हणुन कर्तव्यावर असतांना बेजबाबदार व निष्काळजीपणा केल्यामुळे तुम्ही तुमच्या कर्तव्यात कसुर केला आहे.तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुमच्या अश्या वर्तणुकीमुळे पोलीस विभागाची प्रतिमा मलिन होण्याची दाट शक्याता आहे. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर न झाल्याने पुन्हा बिनतारी संदेश दिनांक ०४/१२/२०२४ अन्वये दिनांक ०५/१२/२०२४ रोजी तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी आमचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलविण्यात आले असता. तुम्ही तुमचे मौखीक म्हणणे आमचे समक्ष मांडले असुन, तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेवून व सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात

कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोना-४६३ भारसाकळे/१०८०२/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक पोउपआ/ परि-१/स्पष्टीकरण/९४२/२०२४, दिनांक १५/०६/२०२४
२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/ का.दा.नो./पोना-४६३ भारसाकळे/६३६८/२०२४, दिनांक १२/०७/२०२४

**कसुरदारचे नाव** :- पोना/४६३ संजय भारसाकळे, नेमणुक पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोना/४६३ संजय भारसाकळे (डी.बी.पथक), पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दिनांक २७/०४/२०२४रोजी पो.स्टे.नागपुरी गेट येथील अप क्र. १५७/२०२४ कलम ३०२, ३२४, ३४१, ५०४, ३४ भादवि अन्वये दाखल झालेला असुन सदर गुन्हयांतील आरोपी क्र. ०३ शेख शहबाज ऊर्फ मुरारी शेख कलीम, वय २४ वर्ष रा.पठाण चौक, अमरावती या हद्दपार इसमावर कारणे दाखवा नोटीस तामीली करीता पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ४६६/२०२४, दिनांक ०३/०५/२०२४ अन्वये पो.स्टे.नागपुरी गेट येथे पाठविण्यात आली होती. ती कारणे दाखवा नोटीस पोलीस स्टेशन कडुन दिनांक ०५/०४/२०२४ रोजी तामील करुन नोटीस तामीलीचा अहवाल पो.स्टे.नागपुरी गेट येथील जावक क्र. ५३३/२०२४, दिनांक ०९/०४/२०२४ नुसार सादर करण्यात आला आहे. नमुद दिलेल्या तारखेमध्ये उपरोक्त हद्दपार इसम हा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कार्यालयात हजर न झाल्याने त्यांचे विरुध्द पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ कार्यालयांचे पत्र क्र. ५२९/२०२४, दिनांक १०/०४/२०२४ अन्वये दुसरी नोटीस तामीली करीता पुन्हा पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथे पाठविण्यात आली, परंतु पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथुन हद्दपार इसम शेख शहबाज ऊर्फ मुरारी शेख कलीम, वय २४ वर्ष रा.पठाण चौक, अमरावती यांला दुसरी कारणे दाखवा नोटीस वेळेच्या आत तामील करण्यात आली नसल्याने नमुद हद्दपार इसमाने यांनी वरील नमुद प्रकारचा गंभीर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे. तुम्ही पो.स्टे.नागपुरी गेट येथे डी.बी.पथक मध्ये असुन कर्तव्यावर असतांना बेजबाबदार व निष्काळजीपणा केल्यामुळे तुम्ही तुमच्या कर्तव्यात कसुर केला आहे. तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तुम्हाला बोलाविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर न झाल्याने पुन्हा बिनतारी संदेश दिनांक ०४/१२/२०२४ अन्वये दिनांक ०५/१२/२०२४ रोजी तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी आमचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलविण्यात आले असता. तुम्ही तुमचे मौखीक म्हणणे आमचे समक्ष मांडले असुन, तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेवून व सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**३.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/सपोउपनि-७०६ घुगे/१०८००/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

## आदेश

तुम्ही सपोउपनि/७०६ निवासराव घुगे, पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांनी दिनांक ०७/०८/२०२४ रोजी ११.०० वा. दरम्यान पो.स्टे.वलगांव येथे आले असता तुमचे दप्तर निरीक्षण केले असता तुमच्या कडे पो.स्टे.वलगांव येथील तपासावर असलेले गुन्हे भाग १ ते ५ चे ०४ गुन्हे, भाग ६ चे ०४ गुन्हे व ०४ मर्ग तपासावर प्रलंबित असल्याबाबत निदर्शनात आले असल्यानेतुम्ही तुमच्या कर्तव्यात निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला असल्याने तुम्ही कर्तव्यात कसुर केलेला आहे. त्यामुळे तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

# भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/पोकनि/स्पर्धा परवानगी/यादव/२७४/२०२५ अमरावती शहर दिनांक ०९/०१/२०२५**

## आदेश

सहा.पो.उप.नि.शिवचरण यादव ब.न.१७६४ नेमणुम बी.डी.डी.एस. यांना 1 st SOUTH ASIA MASTER ATHLETIC OPEN CHAMPIONSHIP 2025 या स्पर्धेचे आयोजन दि.१०/०१/२०२५ ते दि.१२/.०१/२०२५ या दरम्यान मांगला स्टेडीयम, बंगलोर, राज्य कर्नाटक येथे आयोजीत स्पर्धेत भाग घेण्याकरीता खालील अटीचे अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

१) स्वखर्चाने व स्वताचे जबाबदारीवर स्वताचे सुरक्षेतेची काळजी घेवुन स्पर्धेत भाग घ्यावा.

२) त्यासाठी अधिकृत रजा मंजुर करुन घ्यावी.

३) जिवितास कोणतेही नुकसान झाल्यास त्यास हे कार्यालय व शासन जबाबदार राहणर नाही.

**(गणेश शिंदे)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस